I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 158-161
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# आंबेडकर चळवळ आणि दादासाहेब गायकवाड यांचा सहसंबंध

**प्रमोद नानाजी घ्यार व प्रतिभा रमेश पारखी**
इतिहास विभाग, महिला महाविद्यालय बल्लारपूर, जि.चंद्रपूर
डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपूर
*Corresponding Author :- pramodghyar52@gmail.com, pvirutkar1985@gmail.com

Communicated : 20.01.2023 | Revision : 28.02.2023 Accepted : 27.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा नेतृत्वाखालील चळवळीने महाराष्ट्राला जे नेते दिले त्यात दादासाहेबाचे स्थान अग्रभागी होते. डॉ. आंबेडकरांचा सर्व महत्वाच्या चळवळीत दादासाहेब सहभागी होते. दादासाहेब आंबेडकरांचे सहकारी होते. व त्यांची भारतीय अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे बघण्याची स्वत:ची दृष्टी होती. एका अर्थी ते बाबासाहेबांचे शिष्य होते. पण चिकित्सक दृष्टी असणारे मनातील शंकेचे निरसन होत नाही आपणास जो पर्यंत पटत नाही तो पर्यत प्रश्न विचारण भंडावणारे शिष्य पण एकदा शंकेचे निरसन झाल्यानंतर तन–मन–धनाने चळवळीत सामील होणार बाबासाहेबांचा शब्द खाली न पडू देणारे प्रसंगी जिवाचे रान करणारे जिवाला जीव देणारे. बाबासाहेबाच्या कार्यात सहभागी होऊन त्यांनी त्याच्या सामाजिक, राजकीय, कार्यात संघर्षाचा परमोच्च शिखर गाठण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी स्वत: चा विचार न करता आणि आपल्या कुटूंबाचा विचार न करता या दलित कुटुंबाचा विचार केला. त्याना येणाऱ्या अडचणी कश्या प्रकारे दूर करता यावी याचाच विचार डोक्यात आणीत. त्यांनी दलितासाठी वेगवेगळ्या चळवळीत सहभागी होऊन त्यांना त्या अंध:कारण जिवनातून सुर्याचा प्रकाश दाखविणाचा प्रयत्न केला आहे. बाबासाहेबांनी सांगीतलेल्या प्रत्येक कार्यात विश्वासाने चिकाटीने धैर्याने ते कार्य पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांना समाजाचा द्वेष पत्कारून त्यांनी दलितांना सर्व गोष्टीत न्याय मिळावा हेच त्याचे ध्येय होते. या दलितांना सर्वसामान्य सारखे जीवन जगता यावे यासाठी दादासाहेबाची धडपड होय.

दादासाहेबांनी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी प्राणांची पर्वा न करता किंवा कोणताही विचार न करता सतत झटत राहीले. डॉ बाबासाहेबाच्या प्रत्येक कार्यात सहभाग दाखविण्याचा प्रयत्न केला. आणि त्यामध्ये ते यशस्वी सुद्धा झाले. दलितांना शिक्षणात, समाजात, राजकीय कार्यात हक मिळावा यासाठी त्यांनी केलेल्या चळवळीत मनापासून आणि चिकाटीने प्रयत्न केला.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी सामाजिक कार्यातूनच विविध पातळीवर केलेले संघर्ष किंवा चळवळी या त्यांच्या सामाजिक अस्पृश्यांना मिळालेली विकासाची विजयाची साक्ष होती. या सर्व गोष्टीमधूनच सामाजिक चळवळी बरोबर राजकीय कृतीचे चांगल्या प्रकारे विकास करता येते, असे त्यांना वाटत होते.

**मुख्यशब्द** :चळवळ अस्पृश्यता, दलित, सामाजिक, राजकीय संघर्ष

## प्रस्तावना :

डॉ. आंबेडकर व दादासाहेब गायकवाड यांची पहिली ऐतिहासीक भेट म्हणजे एकदा दादासाहेबांना भेटण्यासाठी डॉ. बाबासाहेब त्यांच्या वसतीगृहात गेले होते. दादासाहेबांनी त्यांचा फोटो फक्त वर्तमान पत्रात बघीतला होता. असे समोरासमोर कधी बघीतले नव्हते. हिच ती पहिल्यांदा भेट. त्यांना दादासाहेबांनी खुर्चीवर त्यांना चहा, न्याहारीचा प्रबंध केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरला बुद्धारीज्य आनंदाच्या रुपात दादासाहेब भेटले. या दोन युगप्रवर्तकाची ही प्रथमच भेट आनंद जसा बुद्धाचा एकमेव एकनिष्ट शिष्य या भेटीनंतरच झाला. गुरुशी भेट त्यांच्या कोर्टाच्या कामाच्या निर्मीताने झाली खरी, परंतु ही भेट त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली. त्यांच्या भेटीने त्यांचा जीवनाला नवी दिशा मिळाली. नवीन व अभुतपूर्व क्रांती घडली. या भेटीपासूनच शेवटपर्यंत ते एकनिष्टने कडकळीने, मायेने, पितृवात्सल्याने एकात्म पावून सेवा केली. गुदच्या सर्व कार्यात एकनिष्ठेने आघाडीवर राहिल्या आणि आपले कर्तुत्व सिद्ध केले.

१९२६ साल उजाडले खरे, परंतु हे साल भाऊरावांच्या आयुष्यात न कळत फार मोठी क्रांती करून गेले. साल जर त्यांच्या आयुष्यात उजाडले नसेत तर कोण जाणे भाऊराव फक्त भाऊरावच राहिले असते. आंबे येथील शेतकरी राहिले असते किंवा वर्षानुवर्षे त्या शाहू छत्रपति वसतिगृहाचे अधीक्षक म्हणूनच राहीले असते. या भेटीनंतर ते जेव्हा जेव्हा शाहू वसतिगृहात उतरत तेव्हा सारी सरबराई करण्याचे काम भाऊराचच करीत असत मग त्यांना काय हवे काय नको ही सारी व्यवस्था अतिशय उत्तम पद्धतीने करत. मग एकदा डॉ. बाबासाहेबांनी म्हटले, "तू इतका चौकस हुशार आहे,

तर तुला एक काम देते ते  म्हणजे केसमध्ये होणाऱ्या साक्षी  उतरवून घेण्याची त्यांच्या झरझर लेखनावर सुवाच्य व वळणदार अक्षरावर बाबासाहेब खूष झाले". अस्पृश्यांची गेली पाच हजार वर्षाची गुलामी नष्ट करण्याचे अद्वितीय ऐतिहासिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या रूपाने एका अस्पृश्यानेच केले. असा महान आदर्श संपूर्ण जगाच्या इतिहासात शोधून सापडत नाही. डॉ. आंबेडकर विचार प्रवाहातील ज्यांनी घरादारावर पाणी सोडले समाजसेवेचे असाधारण व्रत अंगीकारले. दलित व अस्पृश्य समाजावर होणार्या अन्यायाला वाचा फोडली, अपमानाचे लाचारीचे व बिगारीचे जिणे नाकारण्यात आल्यामुळे अनन्वित छळास बळी पडले. समतेची निळी पताका खांद्यावर घेऊन गावोगावी प.पु.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे वारकरी झाले व आम्हाला ही "माणूस म्हणून जगू द्या" अशा गगनभेदी गर्जना करू लागले. त्या आंबेडकरी सैनिकाच्या कृतीला व विचाराला क्रांतीची ओढ आहे. मातेची ममता आहे. विचारवंताची झेप आहे. कृपावंताची करुणा आहे. अशा या आंबेडकरी सैनिकांच्या जीवन कार्याचे चिरंतन स्मारक निर्माण व्हावे म्हणून ही डॉ. आंबेडकर सैनिकाची गौरव गाथा संकलित करण्यात येत आहे. त्यात कोणी सामाजिक सुधारणेचे कार्य केले, कुणी भूमिहीनांच्या सत्याग्रहात भाग घेतला, कोणी मंदिर प्रवेश व पाणवठे खुले करण्याची मोहीम हाती घेतली तर कोणी पंचशील झेंडा, भ. बुध्द, प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाकरिता संघर्ष केला, तर कोणी विहाराच्या जागेकरिता, कोणी नामांतराकरिता मोर्चा, कोणी शाळा, कॉलेजेस उघडले, वसतिगृह स्थापन केले. काहीनी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पत्रकारिता अंगीकारली. इ. कलेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरी विचार प्रसार केलेत.

"कोणत्याही महापुरूषाच्या अभूतपूर्व क्रांतीनंतर त्याला तोलून धरण्याची ताकदही त्यानंतरच्या नेतृत्त्वात असते. त्या महापुरुषाच्या शब्दाला आणि कृतीला जागवीत हा 'कारवा' पुढे चालवावा लागतो. तरच इतिहासात त्याला स्थान प्राप्त होते. जागतिक क्रांत्याच्या बाबतीत हेच पडले आहे. बाबासाहेब आंबेडकरनामक महासूर्याने जी अभूतपूर्व क्रांती केली ती तोलून धरणे साधे सोपे काम नव्हते, सर्वत्र शत्रूच्या महा जबड्यातून या चळवळीला वाचवायचे होते. सत्ता, संपती प्रतिष्ठा यांच्यापासून वंचित असलेल्या जनतेला अल्पसंख्याकांना सत्ता, संपती, प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी संघर्षरत करायचे होते. अनेक अडचणीचा डोंगर पार करायचा होता. एकट्याचे नेतृत्व मानायला समाज तयार होता. पण त्यानंतरचे नेतेच तयार नव्हते. ही धग बाबासाहेबांच्या काळापासूनच होती. बाबासाहेबांच्या प्रभावाखाली ही धग दबून होती. कधी कधी बाबासाहेबांनाच राजकारणाची उबग आलेली दिसते. तरी ते राजकारण सोडत नाहीत. रिपब्लिकन पक्षाचा राजकीय प्लॅन जनतेला देतात आणि त्याला मूर्त स्वरूप देण्याआधीच ते या जगातून निघून जातात. अशा परिस्थितीत नंतरची काय परिस्थिती झाली असेल याची कल्पना करवत नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी उभ्या केलेल्या चळवळी आणि दादासाहेबगायकवाड यांचा सहभाग:**

बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन एका उफाळलेल्या महासागरासारखे होते  आपल्या हयातीत त्यांने अनेक वेळा आपल्या प्रतीस्पर्धांची आव्हाने स्विकारली आणि अनेक वेळा त्यांनी आपल्या विरोधकांना आव्हाने दिली, त्यांच्या महापरिनिर्वाण होऊन खुप काळ लोटला तरी पण आजही त्यांचे विचार वादळी ठरत आहेत. डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यता  स्वत: अनुभवली होती त्यांना प्रत्येक ठिकाणी जातीयतेचे चटके बसत असत होते आंबेडकराचे अस्पृश्यता निवाळ्याचे कार्य वाहून शाहू महाराज अस्पृष्य समाजाला म्हणतात की, "तुमचा नेता तुम्ही योग्य निवडला आहे आणि मला पण असे वाटते की तुमच्या सामाजिक, राजकीय, धार्मीक, नैतिक, सांस्कृतिक, आर्थिक प्रगती केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही.

डॉ. बाबासाहेब सोबत त्यांनी वेगवेगळ्या चळवळीत भाग घेतला सामाजीक, राजकीय कार्यात सहभाग घेतला. अशीच एक चळवळ दलित समाजाला गावातल्या विहिरी किवा तळ्यावर पाणी पिण्यासाठी मिळू नये अशी तरतूद संपूर्ण  समाजाने करावी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी  गुरे ढोरे पिऊ शकतात पण माणसासारखा माणूस त्या पाण्याला स्पर्शही करु शकत नाही. केवढा हा दलित समाजावर अन्याय होता. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरानी समतेसाठी दलिताच्या उद्धारासाठी अनेक चळवळी केल्या

आणि या चळवळीत त्यांचे उजवे हात मानले जाणारे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या प्रत्येक चळवळीत सहभाग होता.

"परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या हयातीत अनेक महत्तम राजकीय सामाजीक, आर्थीक, शेक्षणिक व धार्मीक प्रश्नांचा भाऊरावाशिवाय दुसऱ्या कोणत्याही व्यक्तिला अथवा विद्वानाला सल्ला मसलतीत घेतले नाही. यावरुन ऐवढे सिद्ध होते की, बाबासाहेबांना भाऊराव हि एक व्यक्ति सुयोग्य, जिव्हाळ्याची, बुद्धिमान, ध्येयनिष्ठ व कार्यक्षम वाटत असावी म्हणूनच माझ्या पाठीमागे आपण या सर्व समाजाची, समाजकार्याचा जबाबदारी अंगावर घेण्यास तयार असले पाहिले असे बाबासाहेब दादासाहेबांना आव्हान करीत असल्याचे दिसतात.

नाशिक येथील काळाराम मंदिर पश्चिम भारतातील सर्वात प्राचीन धार्मिक मंदिर होते. हे मंदिर इ.स. १७८२ मध्ये सरदार रंगनाथ ओठेकर यांनी बांधले. परंतु येथे दलितांना जाण्यास बंदी होती. यामुळे दादासाहेबाने यात पुढाकार घेऊन त्यांनी या मंदिरात प्रवेश घेण्यासाठी चळवळ उभारली पण त्या चळवळीत यश येण्याऐवजी अपयश आले. पण दादासाहेबांना कळले की आपण या मंदिरात प्रवेश देत नाही या कडे लक्ष न देता हा सत्याग्रहाचा विचारच या प्रश्नावर रद्द करावा. मी अस्पृश्यांना असा सल्ला देतो की, त्यांनी हिंदु धर्माशिवाय व समाज यांची पूर्णता पूर्णरचना करण्याचा आग्रह धरावा त्यातच अस्पृश्यांना आपल्या हक्काबाबत जागृत करणे व त्यांच्यात जोम निर्माण करणे हाच सत्याग्रह सुरु करण्यामागे मोठा हेतु होता.

**धर्मांतराची घोषणा:**

डॉ. आंबेडकरानी स्पष्ट केले की मंदिर प्रवेश किवा मूर्तिपूजा आमचा अंतिम उद्देश नाही. दि. ३ मार्च १९३४ रोजी दादासाहेब गायकवाडाना लिहीलेल्या पत्रात ते लिहितात की "हिन्दू धर्मामधे आपले स्थान काय आहे हेही त्यांना कळेल त्या दृष्टीने माझा हेतू स्पष्ट झाला आहे. १५ ऑक्ट्रोवर १९३५ रोजी येवला जिल्हा (नाशिक) येथ सर्व अश्पृशांची सभा डॉ. बाबासाहेबाच्या अध्यक्षतेखाली झाली या सभेसाठी अस्पृश्य वर्गातील सर्व स्तरांतून १०,००० च्या वर लोक उपस्थित होते डॉ. आंबेडकरानी हृदयस्पर्शी भाषण केले. अस्पृश्याची धार्मीक, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात जी दुर्दशा झालेली आहे. त्याबददल त्यांनी विचार मांडले साधे माणूसकीचे अधिकार मिळवण्यासाठी आणि हिंदु समाजाप्रमाणे समानतेचा दर्जा प्राप्त करण्यासाठीची ही चळवळ निष्पळ ठरली त्या चळवळीसाठी व्यतीत केलेला वेळ काळ आणि पैसा वाया गेले आहेत. ही मोठी दु:खदायक वस्तुस्थिती आहे. म्हणून या गोष्टीसंबधी अखेरचा निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे, म्हणून जो धर्म आपल्याला समान दर्जा देईल, समान हक्क देईल आणि योग्य तऱ्हेने वागविल असे एखाद्या दुसऱ्या धर्मात जावे, असे तुम्हाला वाटत नाही काय? हिंदूधर्माशी संबंध तोडा स्वाभिमान आणि शांतता मिळवा अशा एखाद्या दुसर्या धर्मात जा. परंतु लक्षात ठेवा जो धर्म तुम्ही निवडलात त्यात समान दर्जा समान संधी आणि समान वागणूक मिळाली पाहिजे. आपल्या स्वत:बदल म्हणाले की दुर्दैवाने मी अश्पृश्य म्हणून जन्मलो हा काही माझा अपराध नाही परंतु मरताना मात्र मी हिंदू धर्मात मरणार नाही. " डॉ.आंबेडकरानी धर्मांतर करण्याचा निर्णय जाहीर केला आणि त्याच वेळी काळाराम मंदिर प्रवेश सहा वर्ष चाललेली चळवळ मागे घेण्यात आली. यासाठी कुणी यावर टिकापण केली. पण डॉ. बाबासाहेब मागे हटले नाही.

डॉ. आंबेडकर व दादासाहेब गायकवाड याच्यांत बौद्ध धर्मविषयी चर्चा व्हायच्या पुढे डॉ आंबेडकरानी बौद्ध धर्म स्वीकारण्याचे पक्के केल्यानंतर दादासाहेबांनी या धर्मबद्दल अस्पृश्यांना माहिती करून देण्यासाठी दादासाहेब म्हणायचे की साऱ्या जगात बुद्धधर्मीय लोकांची संख्या अधिक आहे. आणि वेळ पडली तर आपल्याला इतर देशातील लोकही मदत करतील अशा प्रकारे डॉ. बाबासाहेबांनी धर्मांतराचा निर्णय घेतला.

**उद्दिष्टे :**

१.कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या सामाजिक कार्याच अभ्यास करने.

२.डॉ. बाबासाहेब व दादासाहेब गायकवाड यांचा महसंबंध अभ्यासणे.

३. दादासाहेबानी दलितासाठी केलेला सत्याग्रहचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

कोणतेही संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी शास्त्रसुद्ध वैज्ञानिक वस्तुनिठ तसेच समीक्षात्मक अभ्यास पद्धतीचा आधार घेण्यात येईल आंबेडकर चळवळ आणि दादासाहेब गायकवाड यांचा सहसंबंध " हा विषय असून प्रस्तूत विषच्या संदर्भात माहिती संकलित करण्यात येऊन त्याचे विश्लेषण करुन शास्त्रशुद्ध पद्धतीच्या आधारे संशोधन पूर्ण करण्यात येईल

**गृहीतके:**

१)दादासाहेब व गायकवाड यांनी. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिवनाच्या चळवळीला गतिमान केले.

२)दादासाहेब गायकवाड यांच्या चळवळीच्या माध्यमातून अस्पृशसमाजाला संघर्षरत केले.

३)अश्पृशाना, दलितांना, सामाजिक चळतीत सहभागी केल्यामुळे त्यांना अन्यायाशी लढण्याची शक्ती मिळाली.

**स्मारोप:**

प्रस्तूत संशोधन कार्यातून हे स्पट होते, की डॉ. बाबासाहेब व त्यांचे सहकारी दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली दलितांच्या उद्धारासाठी जीवाची पर्वा न करता कार्यरत राहिले. डॉक्टर बाबासाहेब सोबत दादासाहेबांनी नेतृत्व करून त्यांना त्याच्या हक्काचे त्यांच्या हे स्वतंत्र समस्येला वाचा फोडली अन्यायाच्या या जाचातून दलितांच्या सामाजीक जीवनात परिवर्तन घडवून आणले आणि त्यासाठी स्वतचा विचार केला नाही, पण आपल्या कुंटुबाचा सुद्धा विचार केला नाही त्यांनी विचार केला तर दलिताची उध्दाराचा आणि निस्वार्थ कार्यामुळे त्याचे स्मरण आपण करतो.

**संदर्भ:**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तुत्व महाराष्ट्र राज्य साहित्य आणिसंस्कृती मंडळ, मुंबई

दादासाहेब गायकवाड जीवन व कार्य, हरिभाऊ पगारे

माझी जीवन गाथा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर